महाराष्ट्र शासन
गृह विभाग

☎दुरध्वनीक्रमांक :- ०२२-२६५२ ९९२६
ई-मेल :-dcpcybercrime.mum@mahapolice.gov.in Bank

पोलीस उप आयुक्त (सायबर गुन्हे), मुंबई
यांचेकार्यालय,
पहिलामजला, बी.के.सी. पोलीसठाणे,
बी.के.सी., बांद्रा (पुर्व), मुंबई- ४०० ०५१

## !! प्रेसनोट !! दि.३०/११/२०२४

# १९३० सायबर हेल्पलाईन, मुंबई यांना चेंबूर येथील महिलेचे ऑनलाईन शेअर ट्रेडींग फ्रॉड मधील फसवणूक झालेले १.२२ करोड रूपये वाचविण्यात यश !!

मुंबई शहरातील नागरीकांची सायबर गुन्हयांमध्ये फसवणुक झालेल्या तक्रारींची नोंद करणेकामी व फसवणूक रक्कम सबंधित बॅंक खात्यामध्ये गोठविण्याकरीता दि. १७/०५/२०२२ रोजी पासुन मुंबई पोलीस गुन्हे शाखे अंतर्गत १९३० हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर कक्षामध्ये ०२ अधिकारी व ४८ अंमलदार ३ शिफ्टमध्ये कार्यरत आहेत याद्वारे सायबर गुन्हयात आर्थिक फसवणुक झालेले तक्रारदार यांनी त्यांची फसवणुक झालेनंतर १९३० हेल्पलाईनवर तात्काळ संपर्क केला असता NCRP पोर्टलवर तक्रार नोंद करून नागरिकांची फसवणुक झालेली रक्कम सबंधित बॅंक खात्यांवर गोठविण्यात येते.

**दिनांक २९/११/२०२४ रोजी १९३० सायबर हेल्पलाईनवर प्राप्त विविध तक्रारीमध्ये व्हॉट्सअॅप/टेलेग्राम यासारख्या सोशल मिडीयाचे माध्यमातून शेअर मार्केट ट्रेडींग मध्ये भरघोस नफा कमवुन देण्याचे अमिष देवून बनावट शेअर ट्रेडींग द्वारे गुंतवणुक करण्यास भाग पाडणे (Online Fake Share Trading Fraud) मध्ये फसवणुक झालेल्या रकमेपैकी एकुण १,२२,०२,६७१/- रूपये (अक्षरी रू. एक कोटी बावीस लाख दोन हजार सहाशे एक्काहत्तर ) विविध बॅंक खात्यावर १२ तासात होल्ड करून वाचवण्यात १९३० सायबर हेल्पलाईन पथकास वाचविण्यास यश आले आहे.**

चेंबुर, मुंबई येथे राहणाऱ्या तक्रारदार महिला यांना सोशल मिडीयाचे माध्यमातून ऑनलाईन संपर्कात आलेल्या इसमांनी **Pre IPO, Gray Market Trading** या अंतर्गत शेअर मार्केटमध्ये अल्पावधीत भरघोस नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांना **WhatsApp** ग्रुपवर अॅड करुन लिंक द्वारे पाठविलेले अॅप डाउनलोड करण्यास प्रवृत्त करुन व **RTGS** यांचे मार्फत वेगवेगळया बॅंक खात्यांवर पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडून त्यांची एकुण २,६१,१०,०००/- रु ची फसणुक केली. सदर प्रकरणी फसवणुक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदार यांनी १९३० सायबर हेल्पलाईनवर संपर्क करून माहिती दिली.

सायबर हेल्पलाईन १९३० कक्षाचे पोउनि मंगेश भोर, पोउनि निवृत्ती बावस्कर, मपोशि. ११२१०२/बावणे, पोहक्रं. ०१०६४४/राऊळ, मपोह. ०५०१६४/वालावलकर, पोशिक्रं.०८०५९१/पाटील यांनी तात्काळ NCRP PORTAL वर तक्रार दाखल करून सबंधित बॅंक नोडल अधिकारी यांचेशी संपर्क साधुन केलेल्या कार्यवाही मुळे तक्रारदार यांची सायबर गुन्हयात फसवणुक झालेल्या रकमेपैकी

**रू.१,२२,०२,६७१/- (एक कोटी बाविस लाख दोन हजार सहाशे एक्काहत्तर रूपये)** एवढी रक्कम संबधित बॅक खात्यांवर गोठवून वाचविण्यात १९३० सायबर हेल्पलाईन पथक, गुन्हे शाखा मुंबई पथकास यश आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, मा. श्री. शशीकुमार मिना, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे, मा. श्री. राजेद्र शिरतोडे , सहा. पोलीस आयुक्त, सायबर गुन्हे विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दत्ताराम चव्हाण, व.पो.नि. पश्चिम प्रा. सायबर पो. ठाणे, पोउनि मंगेश भोर, पोउनि निवृत्ती बावस्कर १९३० सायबर हेल्पलाईन, गुन्हे शाखा, मुंबई यांच्या पथकाने पार पाडली आहे.

**नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शेअर ट्रेडिंग फ्रॉड प्रकारच्या फसवणूकीपासुन वाचण्याकरिता खालील काळजी घ्यावी.**

- शेअर मार्केटमध्ये अल्पावधीत भरघोस नफा कमावणे बाबत व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्राम, युटयुब व टेलिग्राम या सारख्या सोशल मिडीयावरील जाहीरातींव्दारे आपली फसवणूक केली जावू शकते. अशा जाहीरातींवर पडताळणी न करीता विश्वास ठेवू नये.
- सोशल मिडीयाचे माध्यमातून भरघोस नफा कमवून देण्या-या शेअर ट्रेडिंगच्या जाहीरातींची शहानिशा करावी व गुंतवणूक करतांना योग्यती सावधनता बाळगावी.
- शेअर ट्रेडिंग करीता योग्यत्या संकेत स्थळावरुन नामांकीत कंपन्यांचेच ॲप वापरावे. सोशल मिडीयावरुन प्राप्त लिंकव्दारे तसेच APK फाईल मार्फत कोणतेही ॲप डाउनलोड करु नये. शेअर ट्रेडिंग करताना वेबसाईटची सत्यता तपासून पहावी.
- अशा प्रकारच्या फ्रॉडमध्ये सायबर गुन्हेगार वैयक्तीक किंवा विविध कंपन्यांचे नावे असलेल्या बॅक खात्यांवर पैसे पाठविण्यास प्रवृत्त करतात परंतू सेबी व्दारे रजिस्टर कोणतीही कंपनी वैयक्तीक खात्यांवर पैसे ट्रान्सफर करण्यास सांगत नाहीत.

याव्दारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या बनावट प्रलोभनांना बळी पडू नये व कोणत्याही प्रकारच्या आर्थिक सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर किंवा https://cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा.

**# cybersafemumbai**

**Report Cyber Crime On Helpline 1930 OR**

**https://cybercrime.gov.in**